**राहुल द्विवेदी** भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, अहमदनगर

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर ४१४ ००१
दूरध्वनी क्र. : (०२४१) का. - २३४५००१
Email - collector.ahmednagar@maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

<u>वाचले:-</u> महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-२०१८/प्र.क्र.२/तां.क.३, दि.१३/१२/२०१८.

क्र. म.प्र.नि.मंडळ/उ.प्रा.का:अह/४३०
जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर
दि. ११.०७.२०१९

<u>आदेश-</u>

देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत दि.१७/०१/२०१८ रोजी दैनिक "द हिंदू" मध्ये प्रसिध्द वृत्ताच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या मुळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक २०/०९/२०१८ रोजी आदेश पारित करतांना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्टयांचे वर्गीकरण प्राधम्य क्र. I ते IV प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्टयांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्टयांमधील ९ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. १, ६ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. ११, १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्रमांक III, १० प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. IV व १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. V मध्ये समाविष्ट आहेत. As on September 2018 Polluted River Stretches for Godavari River is <u>Nashik D/s to Paithan</u> . अहमदनगर जिल्हयातील गोदावरी नदीचे प्रदूषित पट्टे प्राथम्य क्रमांक I (९) मध्ये अंतर्भूत करण्यात आलेले आहे. (Priority I(9)- <u>Nashik D/s to Paithan</u>)

मा. हरीत लवाद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्टयांमधील प्रदूषण कमी करण्याकरीता कृति आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरीता नदी पुनरुत्थान समिती, पर्यावरण सनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याचे आदेश उपरोक्त शासन निर्णयानुसार देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषित नदीपट्टयांमधील प्रदूषण रोखण्याकरीता अहमदनगर जिल्हयासाठी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल **(Special Environment Surveillance Task Force)** ची स्थापना मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कृती दलाचे सदस्य |
|---|---|
| १ | अप्पर जिल्हा दंडाधिकारी , अहमदनगर. (जिल्हा दंडाधिकारी अहमदनगर यांचे प्रतिनिधी) |
| २ | जिल्हा पोलीस उप-अधिक्षक (Dy SP- Home) अहमदनगर. (जिल्हा पोलीस अधिक्षक अहमदनगर यांचे प्रतिनिधी) |
| ३ | उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर. (प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे प्रतिनिधी) |
| ४ | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर. (अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे प्रतिनिधी) |

उपरोक्त समितीच्या सदस्यांमध्ये समन्वय साधणे, वेळ प्रसंगी क्षेत्र भेटीचे नियोजन करणे, बैठकांचे आयोजन करणे व निर्णयांची अंमलबजावणी करणे इत्यादी बाबात कार्यवाही करण्याची जबाबदारी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांची राहील.

जिल्हा दंडाधिकारी , अहमदनगर

प्रत:
(१) अप्पर जिल्हा दंडाधिकारी , अहमदनगर
(२) जिल्हा पोलीस उप-अधिक्षक (Dy SP- Home), अहमदनगर
(३) सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर

जिल्हा दंडाधिकारी , अहमदनगर